सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - म्हातारदेव गोरक्षनाथ आव्हाड,
वय - ४७ वर्षे, व्यवसाय- शेती,
राहणार - राजेगाव, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दि. २९/०६/२०२२ राजेगाव येथे पोलिसांनी माझी एका कागदावर सही घेतली. सही कशासाठी घेतली होती हे मी सांगु शकत नाही. माझी सही मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला घटनास्थळ कम जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहित नाही. सहीस निशाणी २८ देण्यात येते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २९/०६/२०२२ रोजी पो. ना. तुपे यांनी मला राजेगाव आपटे वस्ती येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा घटनाठिकाण मला उषा उद्धव आव्हाड यांनी दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी मला पोलिसांनी एक कु-हाडीचा दांडा दाखवला व मला सांगितले की, सदर कु-हाडीने फिर्यादीला मारहाण झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर कु-हाडीचा दांडा माझ्या समक्ष पोलिसांनी जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी सदरचा पंचनामा माझे समक्ष केला व तो मला वाचुन दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे सोबत दुसरे पंच उद्धव आव्हाड होते. हे मला सांगता येणार नाही की, सदरचा पंचनामा सकाळी १०.३० ते ११.०० वाजेच्या दरम्यान झाला किंवा कसे.

उलटतपास आरोपीतर्फे ॲड.पी.सी.नहार यांचे मार्फत नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा

दिनांक-०९/१०/२०२५